# छत्रपती शिवाजी महाराजांची युद्धनीती

**राजकुमार विठ्ठल कडव**
संशोधक

**सारांश**

इतिहासकार शान्टायन म्हणतो, "ज्यांना इतिहासाचे स्मरण राहत नाही त्यांना इतिहासाची पुनरावृत्ती केल्याबद्दल शिक्षा मिळते." अर्थात इतिहासाचे स्मरण न ठेवल्याने इतिहासाची पु`नरावृत्ती होत असते. इतिहास घडविणारे आणि इतिहास बिघडविणारे अशा दोन प्रतिस्पर्ध्यांमध्ये हा डाव रंगलेला असतो. इतिहासात अशी अनेक उदाहरणे आहेत की, अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असतांना देखील परिस्थितीवर मात करून महापुरुषांनी आपले साम्राज्य निर्माण केले. अशा राष्ट्रपुरुषांचे स्मरण हेच राष्ट्र जिवंत ठेवण्याचे एक महत्त्वाचे साधन आहे. महापुरुषांचे चरित्र हाच इतिहास अभ्यासाचा महत्त्वाचा घटक असतो. महापुरुष आपल्या कार्यकर्तृत्वाने इतिहासाला कलाटणी देतात. भारतीय इतिहासातील युगपुरूष, लोककल्याणकारी, प्रजाहितदक्ष जाणता राजा, धुरंधर योद्धा, महान सेनानी म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. शिवरायांनी आपल्या दूरदृष्टीने एक नवी सृष्टी निर्माण केली. म्हणून तर पंडित जवाहरलाल नेहरू यांनी त्यांना 'मानवी सद्गुणांचे साक्षात प्रतीक' असे संबोधले आहे. शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्याचे संस्थापक होत. माता जिजाबाई आणि शहाजी महाराज यांच्या कडून छत्रपतींना युद्ध कलेचे बाळकडू मिळाले.

शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक घटना आणि मोहिमा यांचा वेग विलक्षण होता. पूर्वीची युद्धे ही खुल्या मैदानात समोरासमोर लढवली जात होती. सैन्यात पायदळ, घोडदळ, रथदळ, हत्तीदळ होते. परंतु सह्याद्रीचा प्रदेश हा दऱ्याखोऱ्यांचा डोंगररांगांचा अशा परिस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या सैन्यात पायदळ व विशेषतः घोडदळाला विशेष स्थान दिले. कौटिल्य व सोमदेवाने घोडदळाचे महत्त्व सांगितले आहे. सोमदेवाने असे सांगितले आहे की, 'सैन्याचा वेग हा घोडदळावरच अवलंबून असतो.' छत्रपतींनी आपल्या युद्धतंत्रात काळ, काम व वेग यांचा योग्य समन्वय साधला. 'स्वतःला ओळखा, शत्रूला ओळखा म्हणजे शंभर वेळा युद्ध झाले तरी शंभर वेळा विजय आपलाच' या विचारातून छत्रपतींनी आपली युद्धनीती आखली आणि गनिमी कावा या युद्ध तंत्राचा अंगीकार केला. आरमार उभारले, दुर्गांची निर्मिती केली, कार्यक्षम हेरखाते स्थापन केले, स्वतः आघाडीवर राहून सैन्याचे यशस्वी संचालन केले. परकीय व स्वकीय हितशत्रूंचा यशस्वी सामना करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.

**मूल शब्द Keyword**

छत्रपती शिवाजी महाराज, स्वराज्य, युद्धनीती, गनिमी कावा, सेनापती, गुप्तहेर, सैन्य, युद्ध, रणक्षेत्र

**प्रस्तावना Introduction**

शिवाजी महाराजांची युद्धपद्धती आक्रमक होती. सभोवती परकीय शत्रूंबरोबरच अनेक स्वकीय शत्रूही होते. अशा प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्य स्थापन करण्याचा संकल्प हे धाडसाचे होते. पण

शिवराय हे प्रतिकुलतेचे अनुकूलतेत रूपांतर करणारे द्रष्टे व धाडसी राजे होते. महाराजांना स्वकीय व परकीय अशा दोन्ही शत्रूंबरोबर लढावे लागले. स्वराज्याच्या या हितशत्रूंचा बिमोड करण्यासाठी छत्रपती शिवरायांनी प्रसंगी साम, दाम, दंड, भेद या नीतीची अवलंब केला. सर यदूनाथ सरकार लिहितात, 'कृषकवर्ग ' (कुणबी) शिवाजी महाराजांच्या लष्कराच्या पाठीचा कणा होता. लष्करात कुणबी, मराठे, ब्राह्मण, प्रभू, शेणवी, मुसलमान, न्हावी, महार, कोळी, भंडारी, रामोशी, धनगर, आगरी, वैगेरे ५६ जातीचे लोक होते. शिवरायांचे सैन्य राष्ट्रीय होते. केवळ महाराष्ट्रातील नव्हे, तर भारतातील सर्व जातीतील गुणवंतांना शिवरायांच्या सैन्यात समावेश होता. माणसांची पारख करूनच त्यांचा सैन्यात समावेश केला जाई. शिवराय सर्व सैनिकांची स्वत: व्यक्तीगत तपासणी करायचे.

सैनिकांना नियमित वेतन व कामगिरीनुसार बक्षिसे, बढत्याही देत. पण कडक शिस्त ठेवण्यासही ते विसरले नाहीत. त्यांनी निष्ठावंत सैनिक निर्माण केले. त्यांच्या सैन्यात, स्वराज्याचे कार्य अभिप्रेत होते. आपल्या स्वतच्या: राज्यासाठी आपण हे लढाईचे कार्य करीत आहोत ही त्यांच्यात जाणीव होती. मराठी सैनिकांमध्यें शिवरायांनी घालून दिलेल्या सवयी व आदर्श भिनलेले होते. शिवाजी महाराजांनी स्वतःचे वेगळे युध्दतंत्र विकसित केले. 'गनिमी कावा' हे ते तंत्र होते. परंतू शिवाजी महाराजांनी सर्वच युद्धे गनिमी कावा युद्धतंत्राने लढवली नाहीत.१६६० मध्ये लढवले गेलेले रायबागचे युद्ध, १६७० नंतर लढवलेले साल्हेरचे युद्ध, कांचनबारीचे युद्ध, बहलोलखानविरुद्धचे उमराणीचे युद्ध, दक्षिण दिग्विजयाच्या काळात सन १६७७ - ७८ मध्ये लढलेली युद्धे ही पारंपारिक पद्धतीची युद्धे होती. अशा प्रकारे पारंपरिक व गनिमी कावा युद्ध तंत्राचा अवलंब महाराजांनी केला व यशस्वी झाले.

**संधोधन पद्धती Research Method**

प्रस्तुत संशोधनात संशोधन कार्यसाठी ऐतिहासिक विश्लेषण आणि गुणात्मक पद्धतीचा वापर केला गेला आहे. संशोधन कार्यसाठी संशोधन साहित्य प्रसिद्ध पुस्तकांमधून संकलित केले आहे. प्रस्तुत संशोधन कार्य दुय्यम साधनांवर आधारित आहे, म्हणून संशोधकाने आधुनिक दृष्टिकोन स्वीकारून संशोधन कार्य पुढे नेण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे Research Objective**

- शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वाचा चिकित्सक अभ्यास करणे.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या नेतृत्व गुणांचा अभ्यास करणे.
- छत्रपतींचा गनिमी कावा युद्धतंत्र्याचे महत्त्व सिद्ध करणे.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्य संरचनेचा अभ्यास करणे.
- छत्रपतींच्या आरमार दलाचा वर्तमान संदर्भात अभ्यास करणे.
- शिवाजी महाराजांच्या गुप्तचर यंत्रणेचे अवलोकन करणे.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीचा वर्तमान परिस्थितीत महत्त्व समजणे.

**विश्लेषण:**

चारही बाजूंनी बळकट परकीय सत्ता असतांना त्या सर्वांशी टक्कर घेत स्वराज्य निर्माण करणारा आणि त्या स्वराज्याचे सुराज्यात रूपांतर करून भविष्यातील ‘पेशावर ते तंजावर’ अशा विशाल

हिंदवी साम्राज्याचे बीजारोपण करणारा तेजस्वी महापुरुष म्हणजे छत्रपती शिवराय! महापुरुष तेच जे मोठी स्वप्न पाहतात. पण नुसती स्वप्न पाहून थांबत नाहीत तर ती स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी साधनांची जमवाजमव करून स्वप्न प्रत्यक्ष साकार करतात. स्वातंत्र्याचे ध्येय मूर्त स्वरूपात आणण्यासाठी शत्रूशी सशस्त्र संग्राम करण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता. परिस्थिती पूर्णपणे प्रतिकूल होती. शत्रू अनेक पटीने प्रबळ होता. त्याच्याकडे अनुभवी प्रशिक्षित सैन्य होते. सत्ता, संपत्ती, शस्त्रास्त्रे, सैनिक या कशाचीही त्यांना कमतरता नव्हती. अशा वेळी हाती शून्य असताना स्वातंत्र्याचा ध्यास घेणे म्हणजे मृगजळाच्या मागे धावणे ठरले असते. मात्र राजांनी आपल्या प्रभावी युद्धतंत्राने महत्त्वाकांक्षेचे उत्तुंग शिखर सर केले.

शिवाजी महाराज महान सेनानी होते. लष्करी डावपेचात निष्णात होते. त्यांनी आपल्या कल्पकतेने आणि शौर्याने एक नवीन राज्य निर्माण केले. अद्‌वितीय योध्दा, साहसी लढवय्या, धाडसी सैनिक, मुत्सद्दी सेनापती हे त्यांचे मूलभूत गुण होते. सुष्टांचा मित्र आणि दृष्टांचा कर्दनकाळ हे त्यांचे ब्रीद होते. तत्कालीन फ्रेंच प्रवासी अँबे कॅरे लिहितो, 'सिंधु नदीपासून बंगालच्या उपसागरापर्यंतचा प्रदेश काबीज करावयाची त्यांची मनीषा होती.' शिवाजी महाराज हे अजिंक्य लढवय्ये होते. राज्यकारभाराची कला त्यांना पूर्ण अवगत होती. शिवाजी महाराजांचे युद्धनेतृत्व, हे त्यांच्या सैन्याचे चैतन्य होते. रॉबर्ट आर्म याने म्हटले आहे, 'उत्तम सेनापतीला आवश्यक असणारे सर्व गुण शिवाजी राजांमध्ये होते. शत्रूसंबंधी बातम्या मिळवण्यात त्यांनी कोणतीही कसूर केली नाही. मोठी रक्कम ते यासाठी खर्च करत असत. कोणत्याही मोठ्या संकटाचा त्यांनी धैर्याने आणि युक्तीने सामना दिला. त्या काळातील सेनानींत ते सर्वश्रेष्ठ होते. हातात तलवार घेऊन आक्रमण करणारे शिवाजीराजे, ही त्यांच्या सैन्याची प्रेरणा होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी बारा मावळातली अठरा पगड जातीची मंडळी गोळा केली. ते काटक, चपळ, चिवट, जिद्दी, शूर, निष्ठावान आणि जीवाला जीव देणारे होते. शिवरायांनी त्यांच्यातील पराक्रम जागा केला. स्वराज्य निष्ठा निर्माण केली आणि सामान्यांकडून असामान्य इतिहास घडवून दाखवला. शिवाय ही माणसं राजांच्या तालमीत तयार झालेली असल्याने त्यांच्या मतांचे दडपण राजांवर राहाणार नव्हते. उलट आपल्या राजाला काय आवडतं आणि काय आवडत नाही याचा विचार करून ते कृती करणारे होते.'

छत्रपती शिवाजी महाराजांच्या यशाचे प्रमुख कारण म्हणजे त्यांनी तयार केलेली सैन्य रचना आणि सैन्य व्यवस्थापन होय. स्वराज्यात फौजेचा साठ टक्के भार घोडदळावर तर चाळीस टक्के भार हा पायदळावर होता. महाराजांनी चतुरंग सैन्य व्यवस्था मोडीत काढून घोडदळ व पायदळ यावर जास्त भार ठेवला. कायम फौजेत 'बारगीर' तर राखीव फौजेत सर्व 'शिलेदार' मंडळी होती. छत्रपतींनी सैनिकांना चांगला आणि वेळेवर पगार दिला. भ्रष्टाचार जन्मालाच येणार नाही अशी यंत्रणा राबवून स्वराज्याचे प्रशासन भ्रष्टाचार मुक्त ठेऊन आदर्श राज्यकारभार केला. छत्रपती हुशार आणि लष्करी डावपेचात निष्णात होते. बचावाचे आणि चढाईचे युद्धही तितक्याच कुशलतेने खेळत. शत्रू प्रदेशात घोडदळ पाठवून प्रदेश जाळून बेचिराख करत आहे. शत्रूवर जरब बसवत असत. 'शत्रूची उपेक्षा करणे आजचे उद्‌यावर घालणे परम अनुचित. सान्निधवासी शत्रू म्हणजे केवळ उदरातील व्याधी त्याचा

पराभव आधी करावा. आपणास राखून गनिम द्यावा.' या शब्दातून शिवाजी महाराजांची युद्धनीती लक्षात येते. युद्धात रणक्षेत्र निवडीला महत्त्व असते. युद्धातील जय वा पराजय या मोठ्या प्रमाणात युद्धस्थळावर अर्थात रणक्षेत्रावर अवलंबून असतो. शिवाजीराजे ज्या प्रदेशात युद्ध खेळले त्या प्रदेशाची त्यांना पूर्ण माहिती होती. युद्धप्रदेशाच्या ज्ञानामुळे शिवाजी ५० टक्के लढाई अगोदरच जिंकत आसत. सह्याद्री पर्वत, दख्खनमधील डोंगररांगा, नद्या, नाले कसे आहेत, दुर्ग, घाटवाटा कशा आहेत, याचा अभ्यास त्यांनी केलाच होता. एवढेच नव्हे, तर नकाशेही काढले होते.

शिवरायांनी सक्षम अशी गुप्तचर यंत्रना निर्माण केली. परकीय मुलुखात घडणाऱ्या घडामोडी, शत्रूचे आक्रमणाचे धोके, विस्तारासाठी अनुकूल परिस्थिती इ. अनेक बातम्या शत्रू गोटात शिरून राजांच्या गुप्तचरांनी आणल्याचे अनेक दाखले देता येतील. फ्रान्सवरून आलेला बर्चेलमु ॲबे कारे लिहून ठेवतो, 'शिवाजी आपल्या गुप्तचरांवर भरपूर धन खर्च करतो. हे गुप्तचर त्याला विविध बातम्या आणून देतात, त्या बातम्यांवर तो योजना तयार करतो व म्हणून त्याला यश प्राप्त होते.' शिवरायांचे गुप्तचर त्यांच्या शत्रूच्या शक्तीचा अचूक अंदाज काढत, त्यानुसार राजे आपली शक्ती पाहून आपली रणनीती ठरवत. विश्वासराव नानाजी दिगे, बहिर्जी नाईक, सुंदरजी प्रभूजी अशी त्यांच्या हेरांची नावे मिळतात. शिवाजीराजांचे हेर बिहारमध्ये भेटल्याची नोंद समकालीन इंग्रज प्रवाशांनी केली आहे. १६६४ ई. या वर्षी पहिल्यांदा जेव्हा शिवाजीराजांनी सुरत लुटले, तेव्हा त्या शहराची बित्तंबातमी बहिर्जी नाईकने काढून आणली होती. 'सुरत मारिलीयाने अगणित द्रव्य सापडेल,' असा सल्लाही त्याने महाराजांना दिला होता. सुरतेत किती पैसा दडलेला आहे, याची माहिती बहिर्जीने आधीच काढून आणली होती. त्यामुळे सुरतेच्या स्वारीत वेळ वाया गेला नाही. स्वराज्य निर्माण करायचे, प्रदेश संपादन करायचे आणि त्याचे संवर्धन करायचे म्हणजे सैन्य हवे. सैन्य सांभाळायचे म्हणजे संपत्ती हवी. त्यासाठी मराठ्यांनी शत्रू प्रदेशातून गडगंज संपत्तीची लूट केली. चौथाई आणि सरदेशमुखी यांसारखे करही शिवाजीराजांनी चालवले होते, इतरही काही कर होते. मराठी मुलखातून उत्पन्नाच्या ३३ -४० पर्यंत महसूल गोला केला. शिवाजीराजांचे हे अर्थकारण फारच बलवान होते. त्यातून सैन्य उभारणी व सैन्य व्यवस्थापणात शिवाजी महाराज यशस्वी झाले.

गतिमान सैन्य हा युद्धाचा अत्यंत महत्त्वाचा घटक ! सैन्याच्या हलचालीमध्ये चपळता असेल, तर युध्दात विजयी होण्याची शक्यता अधिक. शिवाजी महाराजांनी गडाला वेढा घालून गड न जिंकता सरळ हल्ला करून गड जिंकले. शिवाजीराजांचे सैन्य चपळ होते. हत्तीसारख्या धीम्यागतीच्या जनावरांस त्यात थारा नव्हता. लष्कराच्या हालचाली चापल्य आणि वेग यांवर आधारलेल्या होत्या. छत्रपतींनी घोडदळ व पागा यावर विशेष लक्ष दिले होते.अकस्मात आक्रमण हा शिवाजीराजांच्या डावपेचांचा गाभाच होता. चाणक्याने वर्णन केलेल्या कूटयुद्धाचा सातत्याने, प्रकर्षाने अन तितकाच परिणामकारक उपयोग करणारे एकमेव योध्दा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज. छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा घेतली त्याच वेळी स्वतःची वेगळी युद्धनीती, एक पद्धत निर्माण केली. पूर्वीच्या पारंपरिक युद्धतंत्रात शिवाजी महाराजांनी आमूलाग्र बदल केला. या बदलातूनच गनिमी कावा या युद्ध तंत्राचा जन्म झाला. गनिमी कावा या शब्दाला इंग्रजी गुरीला वॉर हा प्रतिशब्द

आहे. गनिम या शब्दाचा अर्थ शत्रू आणि कावा या शब्दाचा अर्थ डाव किंवा डावपेच असा होतो. अर्थात गनिमी कावा म्हणजे शत्रूवर विजय मिळविण्यासाठी खेळलेले डावपेच किंवा युद्धतंत्र होय. शिवरायांच्या युद्धतंत्राला गनिमी कावा हा शब्दप्रयोग वापरला जातो नी तो रूढ झाला आहे. सैन्य संख्या, युद्ध सामग्री आपल्यापेक्षा अधिक आहे, अशा परिस्थितीत ही शत्रूशी दोन हात करत आपल्या कमीत कमी बळाने शत्रूची अधिकाधिक हानी करण्याचे युद्धतंत्र म्हणजेच गनिमी काव्याचा वावर हे शिवाजी महाराजांच्या युद्ध नीतीचा अविभाज्य भाग होता. 'गनिमी कावा' ही शिवरायांची स्वराज्याला मिळालेली फार मोठी देणगी आहे. ही कूटयुद्ध किंवा वृकयुद्ध पद्धतीवर आधारलेली होती. गनिमी कावा तत्त्व अकस्मात छापा, तोही आपल्याला सोयीस्कर अशा जागेवर, स्वतची: कमीतकमी हानी आणि हातात अधिकाधिक लूट किंवा प्रतिपक्षाची साधेल तेवढी अधिक हानी, ही या गनिमी काव्याची तत्त्वे होती.

छत्रपती शिवाजी महाराजांनी कोकण काबीज केला. १६५७ मध्ये महाराजांनी कल्याण, भिवंडी पर्यंतचा प्रदेश जिंकला त्यामुळे सिद्द्यांशी संपर्कसंघर्ष- होणे अपरिहार्य होते. कृष्णाजी अनंत सभासद लिहितो, "पुढे राजीयास राजपुरीचे सिद्दी, घरात जैसा उंदीर तैसा शत्रू यास कैसे जेर करावे म्हणून तजवीज पडली". सिद्द्याचे पारिपत्य करण्याकरिता आरमार उभारण्याची आवश्यकता होतीआरमार. निर्मितीमुळे इंग्रज, डच, पोर्तुगीज, फ्रेंच या सत्तांना शह बसून सार्वभौमत्व सिद्ध होणार होते. याच राजकीय कारणाकरिता महाराजांनी आरमार उभारले. आज्ञापत्रात रामचंद्र पंत अमात्य म्हणतात, "आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यागतच आहे. जैसे ज्यास अश्वबळ त्याची पृथ्वी आहे. तद्वतच ज्याचे आरमार त्याचा समुद्र याकरिता आरमार अवस्यमेव करावे." शिवाजी महाराजांच्या आरमार दलाने लहान बोटी निर्माण केल्या. मुंबईचा एक इंग्रज कॅप्टन विल्यम मिनचिन त्याने मुंबईला पाठवलेल्या एका पत्रात लिहिले आहे, 'या छोट्या चपळ मराठी बोटी आम्हाला आश्चर्यकारकरीत्या फसवतात. अशा बोटी इंग्रज आरमारात हव्यात'.

पोर्तुगीज इतिहासकार परेन शिवरायांविषयी म्हणतो, "गूढ आणि अद्भुतरम्य, साहसप्रेमी आणि धाडसी नशिबवान एक भटक्या सरदार, आकर्षित करणारी तीक्ष्ण नजर, लघवी चर्या, मनमिळावू आणि सौजन्यशील, सिकंदराप्रमाणे शरणागतास औदार्याने वा गवणारा, उत्फुर्त आणि तरल बुद्धिमत्तेचा, झटपट निर्णय घेणारा, सिझरप्रमाणे विजिगीषु, दृढ निश्चयी, शिस्तप्रेमी, निष्णात डावपेची, दूरदृष्टीचा प्रतिभावान राजपटू, कुशल संघटक, दिल्लीचे मोगल, विजापूरचे तुर्क, पोर्तुगीज, डच, इंग्रज, आणि फ्रेंच या प्रतिस्पर्ध्यांशी चतुराईने राजकारण करणारा मुसद्दी." स्वराज्य निर्मितीसाठी मावळ्यांचे उभालेले संघटन, कमी सैन्यदलासाठी आखलेली स्वतंत्र युद्धनीती, कौशल्य ओळखून केलेली सैन्यनिवड, शत्रूच्या गोटातील व प्रजेतील माहिती काढण्यासाठी केलेली हेरगिरी, दुर्गम डोंगरकड्यांवरील गड, किल्ले यांची निर्मिती, पारंपरिक युद्ध तंत्रबरोबरच गनिमी काव्याचा खुबीने केलेला वापर, भविष्यात शत्रू समुद्रमार्गे येणार याची दूरदृष्टी असल्याने केलेली दुर्गनिर्मिती, परकीय आक्रमकांचा धोका ओळखून उभारलेले आरमार, लढाया जिंकण्यासोबतच परिस्थिती विरोधात असताना केलेले तह अशा अनेक पैलूंमुळे छत्रपती शिवाजी महाराज आदर्श शासक व त्याच सोबत कुशल सेनानी ठरतात.

**संदर्भ Reference**

सरदेसाई गो. स., मराठी रियासात खंड - १ शकाकर्ता शिवाजी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८८
कानेटकर वसंत. शिवशाहीचा शोध, परचुरे प्रकाशन मंदिर, मुंबई. १९९७
डॉ. पवार, जयसिंगराव. छत्रपती शिवाजी महाराज, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर
सरकार, यदुनाथ. शिवाजी अँड हिज टाईम, एम. एस. सरकार अँड सन, कलकत्ता - १९६१
सभासद कृ. अ. सभासद बखर
वाकसकर वि. स. शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६२
चंद्र,सतीश. मध्यकालीन भारत, ओरियंट प्रकाशन, हैद्राबाद, १९२०
नेहरू, पंडित जवाहरलाल. भारताचा शोध, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, २०१४
राजवाडे, वि. का. निवडक लेख, समन्वय प्रकाशन, कोल्हापुर
राजवाडे, वि. का. राजवाडे, मराठा इतिहासाची साधने, खंड - १५
केलूसकर, कृष्णजी अर्जुन. छत्रपती शिवजी महाराज, साकेत प्रकाशन
शेजवलकर, त्र्यं. शं. श्रीशिवचरित्र
कुलकर्णी, श्रीधर शिवकालीन राजनीती आणि रणनीती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई - १९९४